# महाराष्ट्र शासन

# नागरी सनद

## अन्न, नागरी पुरवठा व
## ग्राहक संरक्षण विभाग
## मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**२०११**

(सात)

# प्रस्तावना

**अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे उद्दिष्ट :**

नित्य वापराच्या काही शिधा वस्तू स्वस्त दरात किंवा एका ठराविक प्रमाणात जनतेला वाटप करण्यासाठी "सार्वजनिक वितरण व्यवस्था" नावाची योजना या विभागामार्फत राबविली जाते.

**या योजनेची अंमलबजावणी कोण करते ?**

**मंत्रालयीन स्तरावर** - या योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागावर आहे.

**जिल्हा स्तरावर** - अतिरिक्त जिल्हाधिका-यांच्या नियंत्रणाखाली पुरवठा विभागाचे काम जिल्हा पुरवठा अधिकारी व त्यांचे कार्यालय पाहते.

**तालुका स्तरावर** - तहसिलदाराच्या नियंत्रणाखाली पुरवठा शाखा हे काम पाहते. पुणे, नागपूर, सोलापूर अशा मोठया शहरांमध्ये तहसिलदारांच्या कार्यालयाऐवजी झोनल ऑफीसमधून पुरवठा विभाग हे काम पाहते.

**मुंबई, ठाणे शिधावाटप क्षेत्र** - नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांच्या नियंत्रणाखालील विभागीय परिमंडळ कार्यालये व त्याखालील विविध शिधावाटप कार्यालयांमधून हे काम चालते.

शिधापत्रिकेवर प्रत्येक शिधापत्रिकाधारकास एकूण **३५ किलो** तांदूळ अथवा गहू याचे वितरण केले जाते.

वरील वस्तू प्राप्त करुन घेण्यासाठी प्रत्येक कुटूंबाकडे शिधापत्रिका असणे आवश्यक आहे.

शिधापत्रिका मिळण्यासाठी शिधावाटप कार्यालय किंवा तहसिल कार्यालय विहित नमुन्यातील **अर्ज २ रुपये** किंमतीला विकत मिळतो. नवीन शिधापत्रिका मिळणे, शिधापत्रिकेत नाव वाढवणे, नाव कमी करणे, शिधापत्रिका रद्द करणे, हरविलेल्या, फाटलेल्या शिधापत्रिकेऐवजी दुय्यम शिधापत्रिका मिळणे, पत्त्यातील बदल अशा विविध कारणांसाठी अर्जाचे वेगवेगळे नमुने विहीत केलेले आहे.

शिधापत्रिकेसाठी अर्ज अर्जदाराने स्वतः केला पाहिजे.

शिधापत्रिका ही शासनाची मालमत्ता असल्यामुळे पुरवठा निरीक्षक किंवा इतर संबंधित अधिकारी मागणी करतील तेव्हा शिधापत्रिकाधारकाने त्यांना शिधापत्रिका दाखविली पाहिजे. शिधापत्रिका देताना संबंधित कुटुंब / व्यक्ती त्या क्षेत्रातील अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष राहतात किंवा कसे व त्यांचे नाव इतर शिधापत्रिकेत नाही तसेच त्याची या व्यतिरिक्त इतरत्र शिधापत्रिका नाही हे पाहिले जाते. **कोणत्याही व्यक्तीने एकापेक्षा अधिक शिधापत्रिका मिळविणे किंवा एकापेक्षा अधिक शिधापत्रिकेत नाव समाविष्ट करणे हा गुन्हा आहे.**

**कामे पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा :-**

या शिधापत्रिकांसंबंधीची नागरिकांची कामे शिधावाटप कार्यालयातून / तहसिल पुरवठा शाखेतून पूर्ण करण्यासाठी खालीलप्रमाणे कालमर्यादा विहित करण्यात आली आहे :-

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | नवीन शिधापत्रिका देणे (राज्यांतर्गतबदल व पुरावा असल्यास) | ७ दिवस |
| २ | इतर राज्यातून आलेल्या अर्जदारास नवीन तात्पुरती शिधापत्रिका देणे | १५ दिवस |
| ३ | शिधापत्रिकेत नाव वाढविणे | ७ दिवस |
| ४ | शिधापत्रिकेत नवीन जन्मलेल्या मुलाचे नाव वाढविणे (जन्म दाखल्यासह) | १ दिवस |
| ५ | शिधापत्रिकेत नोंद असलेल्या लहान मुलांचे एकांके वाढविणे | १ दिवस |
| ६ | हरवलेल्या शिधापत्रिकेऐवजी दुय्यम शिधापत्रिका देणे | १० दिवस |
| ७ | फाटलेल्या / खराब झालेल्या शिधापत्रिकेऐवजी दुय्यम शिधापत्रिका देणे | ३ दिवस |

**तक्रार कोणाकडे करावी :-**

शिधावाटप दुकान / शिधापत्रिका / शिधावस्तू याबाबतच्या तक्रारी संबंधित तहसिलदार / शिधावाटप अधिकारी यांच्याकडे कराव्यात. तथापि, त्यांनी त्याची दखल न घेतल्यास तसेच शिधावाटप दुकानांची अधिक आवश्यकता / धान्याचा कोटा कमी मिळणे याबाबतच्या तक्रारी खालील तक्त्यात दिलेल्या अधिकाऱ्यांकडे कराव्यात :-

| अ.क्र. | क्षेत्र | कामकाजासाठी सक्षम प्राधिकारी | तक्रार करण्यासाठी प्राधिकारी |
|---|---|---|---|
| १ | मुंबई / ठाणे शिधावाटप क्षेत्र | उप नियंत्रक शिधावाटप | नियंत्रक, शिधावाटप |
| २ | पुणे / नागपूर / सोलापूर | अन्नधान्य वितरण अधिकारी | अपर जिल्हाधिकारी |
| ३ | इतर क्षेत्र | तहसिलदार | अपर जिल्हाधिकारी |

**<u>लाभार्थ्यांसाठी निकष</u>** :-

**क) शुभ्र शिधापत्रिकांसाठी निकष :-**

ज्या कुटुंबातील सर्व व्यक्तींचे मिळून एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये १ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त असेल किंवा त्या कुटुंबातील कोणाही व्यक्तीकडे चार चाकी यांत्रिक वाहन असेल किंवा त्या कुटुंबातील सर्व व्यक्तीच्या नावे मिळून चार हेक्टरपेक्षा जास्त बारमाही बागायती शेतजमीन असेल अशा कुटुंबांना शुभ्र शिधापत्रिका देण्यात येतात.

**अपात्र शिधापत्रिका शोध मोहिम** :

सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण ) आदेश २००१ नुसार शिधापत्रिका तपासणी करणे आवश्यक आहे. राज्यातील अपात्र शिधापत्रिका शोधून रद्द करण्याकरिता शासन परिपत्रक दि.११ सप्टेंबर २००९ अन्वये विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

**बीपीएल, अंत्योदय व अन्नपूर्णा लाभार्थी यादी व मासिक केरोसीन नियतन चावडी वाचन कार्यक्रम.**

बीपीएल, अंत्योदय योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील गरीबातील गरीब नागरिकांना सवलतीच्या दराने अन्नधान्य पुरविण्यात येत आहे. तसेच, अन्नपूर्णा योजनेखाली ६५ वर्षावरील वयोवृध्द निराधारांना मोफत धान्य पुरवठा करण्यात येत आहे. यासंदर्भात विविध माध्यमातून तक्रारी प्राप्त झाल्यामुळे, अशा लाभधारकांची यादी तयार करुन त्यास पुरेशी प्रसिध्दी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यास अनुसरुन शासनाने पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित केल्या आहेत :-

(अ) बीपीएल, अंत्योदय व अन्नपूर्णा योजनेखालील लाभार्थ्यांची गावनिहाय व तालुकानिहाय यादी पुस्तिका तयार करणे,

(ब) सदर यादी गावनिहाय करुन त्यात लाभार्थ्यांचे नाव, वय व पत्ता याचा प्रामुख्याने समावेश करणे,

(क) शहरी भागातील लाभार्थ्यांची यादी वर नमूद तपशीलासह वॉर्डनिहाय तयार करणे,

(ड) लाभार्थीची अचूक यादी व आकडेवारी तयार व्हावी यादृष्टीने तयार केलेल्या लाभार्थी याद्यांचा गावनिहाय चावडी वाचनाचा कार्यक्रम घेण्यात यावा.

(इ) चावडी वाचनाच्या कार्यक्रमामध्ये किरकोळ परवानाधारक/रास्तभाव दुकाननिहाय मासिक केरोसीन नियतनाचेही वाचन करण्यात यावे.

(ई) चावडी वाचनाच्या कार्यक्रमास पुरेशी प्रसिध्दी देण्यात यावी. सदर कार्यक्रमास तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील व मोठया प्रमाणात ग्रामस्थ उपस्थित राहतील असे पहावे.

(प) चावडी वाचनाच्या माध्यमातून लाभार्थी यादींची छाननी करुन त्यामधून अपात्र लाभार्थींची नावे वगळावीत.

(फ) चावडी वाचनाच्या कार्यक्रमाचे इतिवृत्त तयार करुन सर्व उपस्थितांच्या स्वाक्ष-या घ्याव्यात. (भ) या मोहिमेमुळे कमी झालेल्या अपात्र लाभार्थ्यांच्या संख्येएवढे नवीन पात्र लाभार्थी शक्यतो त्याच गावातून निवडावेत. जर असे पात्र लाभार्थी त्या गावात उपलब्ध झाले नाहीत तर तेवढेच पात्र लाभार्थी तालुक्यातील दुस-या गावातून निवडावेत.

**अंत्योदय अन्न योजना :-**

सदर योजना मे, २००१ पासून राज्यात सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत अंत्योदय कुटुंबांना दरमहा ३५ किलो धान्य (गहू व तांदूळ ) गहू रु. २.०० प्रति किलो व तांदूळ रु. ३.०० प्रति किलो या दराने देण्यात येते.

**[iii]** वरील प्रमाणे जाहिरनामा प्रसिध्द केल्यानंतर इच्छूक व्यक्तींना/संस्थाना अर्ज करण्याकरिता (ज्या दिवशी जाहिरनामा प्रसिध्द झाला तो दिवस सोडून) पूर्ण १५ दिवसांची मुदत देण्यात यावी. जाहिरनामा प्रसिध्द होण्यापूर्वी तसेच १५ दिवसांची निर्धारित मुदत संपल्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येऊ नये.



**[iv]** ७३ व्या घटनादुरुस्ती नुसार अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्याच्या अनुषंगाने, राज्याच्या ग्रामीण क्षेत्रामध्ये नवीन रास्त भाव दुकान मंजूर करतांना शासनाने विहित केलेले प्राथम्यक्रम लक्षात घेऊन ग्राम सभेने शिफारस केलेल्या अर्जदारांना रास्त भाव दुकान मंजूर करण्यात यावे असा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार पुढील कार्यपद्धती अवलंबण्यात येते:-

[१] त्यानुसार ग्रामीण भागात जाहिरनाम्यास प्रतिसाद म्हणून प्राप्त होणा-या अर्जाची क्षेत्रिय अधिका-यांमार्फत (पुरवठा निरिक्षक/ निरिक्षक अधिकारी/पुरवठा अव्वल कारकून इत्यादि ) तपासणी क रावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल तयार करुन असा अहवाल ग्रामसेवकामार्फत संबंधित गावाच्या ग्रामसभेसमोर ठेवण्यांत यावा. रास्तभाव दुकान मंजूरीची कार्यवाही प्रलंबित राहू नये याकरिता संबंधित ग्रामसभेची बैठक शक्यतो १५ दिवसात घ्यावी.
[२] तसेच रास्त भाव दुकाने मंजूर करण्यासाठी शासनाने विहित केलेली प्राथम्यसूचीही ग्राम सभेच्या निदर्शनास आणण्यांत यावी.
[३] यासाठी संबंधित पुरवठा निरिक्षक /निरिक्षक अधिकारी/पुरवठा अव्वल कारकून यांनी जिल्हा पुरवठा अधिका-यांच्या वतीने अशा ग्रामसभेच्या बैठकीस निश्चितपणे उपस्थित राहावे.
[४] या विभागाने विहित केलेल्या प्राथम्यसूचीच्या अनुषंगाने रास्त भाव दुकानांसाठी प्राप्त झालेल्या अर्जदारांमधून ग्रामसभेने रास्त भाव दुकान मंजूरीसाठी पात्र अर्जदारांची शिफारस करावी व त्याची ग्रामसभेच्या कार्यवृत्तांतामध्ये नोंद घेण्यात यावी.
[५] त्या कार्यवृत्तांतावर ग्रामसभेस उपस्थित असलेल्या किमान ५ सदस्यांच्या तसेच ग्राम पंचायतीचे सरपंच, उप सरपंच, ग्रामसेवक यांच्या नावासह स्वाक्ष-या घेण्यात याव्यात. तसेच या कार्यवृत्तांवर त्या ग्रामसभेस उपस्थित असलेल्या पुरवठा निरिक्षकाने नावासह स्वाक्षरी करावी.
[६] ग्रामपंचायतीच्या सचिवांनी म्हणजेच ग्रामसेवकाने हे कार्यवृत्त जिल्हा पुरवठा अधिका-यांकडे सादर करावे.
[७] त्याआधारे, जिल्हा पुरवठा अधिका-यांनी ग्रामसभेने शिफारस केलेल्या अर्जदारांना रास्त भाव दुकाने मंजूर करावी. ही कार्यपध्दती दिनांक १ एप्रिल, २००२ पासून अंमलात आहे.

**[v]** शहरी क्षेत्रातील रास्तभाव दुकाने मंजूर करण्याच्या पूर्वीच्या कार्यपद्धतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**[vi]** प्राधान्य सूचीनुसार सारख्याच प्राथम्याने व सारख्याच पात्रतेचे एकापेक्षा अधिक अर्ज आल्यास ईश्वर चिठ्ठीने अर्जदाराची निवड करण्यात यावी व त्यास दुकान मंजूर करण्यात यावे. याकरिता ईश्वर चिठ्ठी काढण्याचे काम तालुका पातळीवरील/शिधावाटप क्षेत्राच्या पातळीवरील दक्षता समितीच्या कमीत कमी ३ सदस्यांच्या उपस्थितीत करण्यात यावे.

**[vii]** उपरोक्त क्र. ii) येथे नमूद केलेल्या संस्थाना दुकान मंजूर करतांना उपरोक्त [iii]येथील पध्दतीचा अवलंब करण्याची आवश्यकता राहणार नाही.

**[viii]** सहकारी संस्थांना रास्तभाव / शिधावाटप दुकान मंजूर करण्यापूर्वी संबंधित सहकारी संस्था ही प्रत्यक्षात कार्यरत आहे, याबाबतची खातरजमा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था यांच्याकडून करुन घ्यावी.

८) ज्या ठिकाणी वारसास कोणत्याही कारणाने परवाना देता आला नाही तर, नेहमीच्या पध्दतीने जाहिरनामा काढून दुकान मंजूरीची कार्यवाही करण्यात यावी.

९

**३) महिलांसाठी ३३ टक्के दुकाने आरक्षित ठेवण्याची कार्यपध्दती :-**

i) रास्त भाव / शिधावाटप दुकान मंजूर करण्यासाठी जाहिरनामा प्रसिध्द करण्यापूर्वी वैयक्तीक महिलांना ३३ टक्के परवाने आरक्षित ठेवण्यात यावेत. हे आरक्षण ठरविताना प्राधिकारपत्र मंजूर करणा-या मंजूरी अधिका-याचे ( उदा. जिल्हयांमध्ये तहसिलदार,मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात नियंत्रक शिधावाटप किंवा पुणे,नागपूर,सोलापूर इ. शहरांमध्ये अन्नधान्य वितरण अधिकारी ) कार्यक्षेत्र हा घटक समजण्यात यावा.

ii) ३३ टक्के या प्रमाणात आरक्षण करताना येणारा अपूर्णांक पुढील पूर्णांकात रुपांतरीत करण्यात यावा. उदा. एखादया तालुक्यात नवीन ५ रास्तभाव दुकाने मंजूर करावयाची असल्यास ३३ टक्के प्रमाणे महिलांसाठीचे आरक्षण १.६५ येते. म्हणून १.६५ हा अपूर्णांक या पुढील पूर्णांकात रुपांतरीत करुन ५ पैकी २ दुकाने महिलांसाठी आरक्षित ठेवावीत. ३३ टक्के आरक्षण हे किमान आहे. त्यापेक्षा जास्त वैयक्तिक महिलांना दुकान परवाने मंजूर करण्यास हरकत नाही. महिलांसाठीचे आरक्षण परिगणित करताना महिलांच्या ग्राहक / सहकारी किंवा इतर संस्थांना दिले जाणारे परवाने आरक्षणात गणले जाणार नाहीत. तसेच हे आरक्षण केवळ वैयक्तिक परवान्यांपैकी ३३ टक्के नसून वैयक्तिक व संस्था अशा एकूण सर्व परवान्यांपैकी ३३ टक्के आहे.

iii) हे आरक्षण राज्याच्या सर्व भागात (शहरी व ग्रामीण ,तसेच आदिवासी व बिगर आदिवासी) लागू राहील. पात्र व्यक्तीगत महिला अर्जदारांमध्ये एकापेक्षा अधिक अर्ज आल्यास अर्जदाराचे शिक्षण, आर्थिक क्षमता, दुकानासाठीची पुरेशी जागा या बाबींचा विचार करुन योग्य अर्जदाराची निवड करावी. iv) वैयक्तिक महिलांसाठी ३३ टक्के परवाने आरक्षित ठेवताना पुढील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी. जाहिरनामे प्रसिध्द करण्यापूर्वी संबंधित तालुकास्तरीय दक्षता समितीच्या सभेमध्ये व अन्नधान्य वितरण अधिकारी, नियंत्रक शिधावाटप,मुंबई यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही एका शिधावाटप कार्यालय दक्षता समितीच्या बैठकीत "ईश्वर चिठ्ठी / चिठ्ठया " काढून ,नव्याने उघडावयाच्या एकूण अधिकृत शिधावाटप / रास्त भाव दुकानांची संख्या लक्षात घेऊन, महिलांसाठी आरक्षित ठेवावयाची ३३ टक्के दुकाने निश्चित करण्यात यावीत व जाहिरनामे प्रसिध्द करतानाच अशा महिलांसाठीच्या आरक्षीत दुकानांचा जाहिरनाम्यात उल्लेख करण्यात यावा.

**४) प्राथम्य सूची :-**

दुकान मंजूरीसाठी महिलांना ३३ ٪. आरक्षण ठेवण्याच्या तरतूदीच्या अधिनतेने खालीलप्रमाणे प्राथम्य सूची विचारात घेण्यात यावी.

***अ) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत समाविष्ट क्षेत्र***

१) ज्या गावाकरिता किंवा गाव समुहाकरिता दुकान मंजूर करावयाचे आहे, त्या गावात किंवा गाव समुहातील कोणत्याही एका गावात कायम स्वरुपी निवास असलेली सुशिक्षित बेरोजगार आदिवासी व्यक्ती (पुरुष किंवा स्त्री)

२) ज्या गाव किंवा गाव समुहाकरिता दुकान मंजूर करावयाचे आहे, त्या गावात किंवा गाव समुहातील कोणत्याही एका गावात कायम स्वरुपी निवास असलेली आदिवासी व्यक्ती (पुरुष किंवा स्त्री )

३) आदिवासी सहकारी संस्था

असलेली शिधावाटप दुकाने रद्द झाल्यानंतर किंवा त्या क्षेत्रातील एकांकामध्ये वाढ झाल्यामुळे नवीन रास्तभाव / शिधावाटप दुकान मंजूर करण्यासाठी जाहिरनामा प्रसिध्द करणे व त्या अनुषंगाने नवीन शिधावाटप दुकान मंजचूर करणे यासाठी पुढीलप्रमाणे कालमर्यादा विहित करण्यात आली आहे :-

११

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | नवीन रास्त भाव / शिधावाटप दुकान मंजूर करण्यासाठी जाहिरनामा काढून नवीन दुकानाकरिता अर्ज मागविणे | जाहिरनामा काढल्यापासून १५ दिवस |
| २ | नवीन दुकानाकरिता प्राप्त झालेल्या, अर्जांची प्राथमिक तपासणी छाननी, जागेची तपासणी व इतर अनुषंगिक कार्यवाही पूर्ण करणे | २ आठवडे |
| ३ | नवीन दुकान मंजूर करणे | १ आठवडा |

**परवाने देणारे प्राधिकारी व दाद मागण्यासाठी यंत्रणा :-**

नवीन रास्तभाव / शिधावाटप दुकानाचा परवाना देण्यासाठी सक्षम प्राधिकारी व एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेस असा परवाना नाकारण्यात आल्यास त्याविरुध्द दाद मागण्यासाठी खालीलप्रमाणे व्यवस्था उपलब्ध आहे :-

| अ. क्र. | क्षेत्र | परवाना देण्यासाठी सक्षम प्राधिकारी | पहिले अपील करण्यासाठी प्राधिकारी | दूसरे अपील करण्यासाठी प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई शिधावाटप क्षेत्र | नियंत्रक, शिधावाटप, मुंबई | मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण | -- |
| २ | पुणे / नागपूर / सोलापूर शहरी क्षेत्र | अन्नधान्य वितरण अधिकारी | संबंधित उप आयुक्त (पुरवठा) | मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण |
| ३ | इतर क्षेत्र | तहसिलदार | संबंधित उप आयुक्त (पुरवठा) | मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण |

**शिधावाटप दुकानदाराने पाळावयाची तत्वे :-**

प्रत्येक शिधावाटप / रास्त भाव दुकानदाराने दुकानाच्या दर्शनी भागात ठळकपणे पुढील फलक लावणे बंधनकारक आहे :-

(१) परवानाधारकाचे नाव, दुकानाच्या कामाच्या वेळा, सुट्टीचे दिवस इत्यादी दर्शविणारा नामफलक
(२) दुकानातील विविध शिधावस्तूंची प्रत्येक दिवशी होणारी आवक, खप, शिल्ल्क साठा दर्शविणारा फलक,
(३) शिधावस्तूंच्या किरकोळ विक्रीचे दर दर्शविणारा किंमतीचा फलक,
(४) गावातील / शिधावाटप कार्यालय क्षेत्रातील दक्षता समिती सदस्यांची नावे दर्शविणारा दक्षता समिती फलक.
(५) दुकानास जोडलेल्या शिधापत्रिका व त्यावरील लोकसंख्या व युनिट्स दर्शविणारा फलक.
(६) शिधावस्तूंचे वितरण प्रमाण दर्शविणारा फलक

स्वतंत्र नियमित तपासण्यांपैकी निम्म्या म्हणजेच नियमित तपासण्या त्यांनी नजिकच्या तालुक्यातील रास्त भाव दुकानांच्या करावयात, अशा सूचना दिनांक २७ एप्रिल, २००२ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

राज्यातील रास्त भाव दुकानांच्या वस्तुनिष्ठ तपासण्या होण्याकरिता शासनाने तपासणीअंती दुकानांना श्रेणी मंजूर करण्याबाबत दि.१९/४/२००५ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत.

१३

**जीवनावश्यक वस्तु स्थिर भाव योजना :-**

खुल्या बाजारातील जावनावश्यक वस्तुंच्या किंमतीत वाढ झाल्यास राज्यातील गरीब जनता खुल्या बाजारातील धान्य खरेदीकरुन आपली गरज सुयोग्यरित्या पूर्ण करु शकत नाही. अशावेळी त्या किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी राज्य शासनामार्फत प्रयत्न करण्यात येतात. त्या करीता सार्वजनिक वितरण व्यवस्थेतर्गत निर्धारित शिधापत्रिका धारकांना स्थिर भावाने गहू, तांदुळ, तूरडाळ व पामतेल यासारख्या जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यात येतो. दि.२१.८.२००९ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये राज्य शासनाने स्वस्त धान्य दुकानांमार्फत वितरीत करण्यात येणा-या गहूं व तांदूळाव्यतिरिक्त तूरडाळ, साखर व पामतेल या पाच शिधावस्तूचा पुरवठा करण्याचा निर्णय घेतला असून आतापर्यंत सदर निर्णयास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. स्थिर भाव योजनेंतर्गत सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरित करावयाच्या गहू, तादूळ, तूरडाळ, पामतेल व साखर या शिधावस्तूंची स्वस्त धान्य दुकानातील किरकोळ विक्री किंमत व परिमाण खालील प्रमाणे आहे.

| अ क्र | वस्तूचे नाव | | सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करण्यात येणा-या शिधा वस्तुंच्या किमंती (रूपये प्रति किलो / लिटर) व परिमाण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बीपीएल | | अंत्योदय अन्न योजना | | अन्नपूर्णा योजना | | एपीएल | |
| | | दर | परिमाण | दर | परिमाण | दर | परिमाण | दर | परिमाण |
| १ | गहू | ५.०० | ३५ किलो प्रतिकार्ड (गहू + तांदुळ) | २.०० | ३५ किलो प्रतिकार्ड (गहू + तांदुळ) | विना मूल्य | १० किलो प्रतिकार्ड (गहू + तांदुळ) | ७.२० | १५ किलो प्रतिकार्ड (गहू + तांदुळ)* |
| २ | तांदुळ | ६.०० | | ३.०० | | | | ९.६० | |
| ३ | साखर | १३.५० | ५०० ग्रॅम प्रति माणशी | १३.५० | ५०० ग्रॅम प्रति माणशी | १३.५० | ५०० ग्रॅम प्रति माणशी | २०.०० | २ किलो प्रतिकार्ड |
| ४ | तूरडाळ | ५५.०० | १ किलो प्रतिकार्ड | ५५.०० | १ किलो प्रतिकार्ड | ५५.०० | १ किलो प्रतिकार्ड | ५५.०० | १ किलो प्रतिकार्ड |
| ५ | पामतेल | ३०.०० | १ लिटर प्रतिकार्ड | ३०.०० | १ लिटर प्रतिकार्ड | ३०.०० | १ लिटर प्रतिकार्ड | ३०.०० | १ लिटर प्रतिकार्ड |

## <u>सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत वितरीत होणा-या धान्याचे नमुने :-</u>

राहते. असे गैरप्रकार टाळून शिधावस्तूंची पुरेशा प्रमाणात व नियमितरित्या दुकानांपर्यन्त वाहतूक होऊन कार्डधारकांना नियमित पुरवठा व्हावा, हा या योजनेचा उद्देश आहे.

सद्यस्थितीत आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रात *महाराष्ट्र राज्य सह. आदिवासी विकास महामंडळ* तर अवर्षणप्रवण क्षेत्रात *महाराष्ट्र राज्य मार्केटींग फेडरेशन,मुंबई* या कार्यान्वयन यंत्रणेमार्फत ही योजना राबवण्यात येते. व्दार वितरण योजना शासकीय वाहनाव्दारे राबविण्यासाठी कार्यान्वयन यंत्रणेला येणा-या सर्व खर्चाची प्रतिपूर्ती आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रातील तालुक्यांमध्ये प्रति क्विंटल रुपये १५.०० या दराने तर अवर्षण प्रवण तालुक्यामध्ये प्रति क्विंटल रुपये १३.०० या दराने करण्यात येते.

१५

## २. *जीवनावश्यक वस्तूंची अनुज्ञेयता*

**शिधावस्तू व वितरण परिमाण :-**

| शिधावस्तूंचे नाव | परिमाण |
|---|---|
| १) गहू<br>+<br>२) तांदूळ | **पिवळया शिधापत्रिकाधारक कुटुंबे**:-<br>**१)अंत्योदय-**<br>दरमहा ३५ किलो धान्य, गहू व तांदूळ मिळून. गहू रुपये २/- प्रति किलो या दराने व तांदूळ रुपये ३/- या दराने.<br>**२)बिगर अंत्योदय** -<br>दरमहा ३५ किलो धान्य, गहू व तांदूळ मिळून. गहू रुपये ५/- प्रति किलो या दराने व तांदूळ रुपये ६/- या दराने.<br>**केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबे** :- दरमहा ३५ किलो धान्य, गहू व तांदूळ मिळून. गहू रुपये ७.२०/- प्रति किलो या दराने व तांदूळ रुपये ९.६०/- या दराने<br>* **शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबे** : धान्य पुरवठयातून वगळण्यात आली आहेत. |
| ३) साखर | दरमहा दर माणशी ५०० ग्रॅम प्रति किलो रु.१३.५०/- या दराने.<br>* केशरी व शुभ्र शिधापत्रिकाधारकांना साखर वितरीत करण्यात येत नाही. |
| ४) चनाडाळ<br>/तूरडाळ | दरमहा प्रतिकार्ड १ किलाग्रॅम प्रति किलो रु.५५.००/- या दराने. |

## ३. सार्वजनिक वितरण व्यवस्था देखरेख दक्षता समित्या

रास्तभाव / शिधावाटप दुकानदारांनी त्यांना सार्वजनिक वितरण व्यवथ्येअंतर्गत वितरण करण्यासाठी मिळालेल्या शिधावस्तूंची परस्पर विक्री करु नये किंवा विल्हेवाट लावू नये यासाठी म्हणजेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरण करण्यात येणा-या जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणावर देखरेख ठेवण्यासाठी विविध पातळयांवर स्थापना करण्यात आलेल्या दक्षता समित्यांची रचना पुढीलप्रमाणे आहे :-

| समितीचा स्तर | समितीचे अध्यक्ष | समितीचे सदस्य-सचिव | अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या |
|---|---|---|---|
| १) ग्राम पंचायत | सरपंच | तलाठी | संबंधित तहसिलदार करतात. |
| २)तालुका | विधानसभा सदस्य (तालुक्यातील जास्तीत जास्त भागाचे प्रतिनिधीत्व करणारे ) | तहसिलदार | संबंधित जिल्हाधिकारी करतात. |
| ३) नगर-पालिका | विधान सभा सदस्य ( जास्तीत जास्त वॉर्डाचे प्रतिनिधीत्व करणारे) | अन्नधान्य वितरण अधिकारी किंवा तहसिलदार | संबंधित जिल्हाधिकारी करतात. |
| ४)जिल्हा | पालकमंत्री | जिल्हा पुरवठा अधिकारी | संबंधित जिल्हाधिकारी करतात. |
| ५)महा नगर पालिका क्षेत्र(शिधावाटप कार्यालय निहाय) | पालकमंत्री यांनी नियुक्त केलेले शिधावाटप कार्यालय क्षेत्रातील विधान सभा सदस्य | अन्नधान्य वितरण अधिकारी किंवा जिल्हा-धिकारी यांनी नियुक्त केलेले अधिकारी | संबंधित जिल्हाधिकारी करतात. |
| ६) मुंबई शिधा-वाटप क्षेत्र (शिधा- | पालकमंत्री यांनी नियुक्त केलेले शिधावाटप कार्यालय क्षेत्रातील विधान सभा सदस्य | सहाय्यक शिधावाटप अधिकारी | नियंत्रक शिधावाटप,मुंबई करतात. |

४) रास्त भाव दुकानामार्फत शिधापत्रिकाधारकांना पुरविल्या जाणारे जीवनावश्यक वस्तूंच्या प्रतीची ( Quality) तपासणी करणे व संबंधित अधिका-यांना त्याबाबत कळविणे.
५) रास्त भाव धान्य दुकानाबाबत शिधापत्रिकाधारकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत रास्त भाव दुकानातील नोंदवहयाची तपासणी करुन त्याबाबतचा चौकशी अहवाल संबंधित अधिका-यांना पाठविणे.

६) बनावट/ खोटया (Bogus) शिधापत्रिका व शिधापत्रिका न मिळालेला गरजू रहिवाशी याबाबत आढावा घेऊन सविस्तर अहवाल संबंधित अधिका-यांस पाठविणे.

१९

७) स्वस्त धान्य दुकानदार अगर शिधापत्रिकाधारक यांनी गैरप्रकार अगर गैरव्यवहार केल्याचे आढळून आल्यास त्याबाबतचा अहवाल संबंधित अधिका-यास पाठविणे.

८) सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने सूचना करणे.
९) रास्त भाव दुकानातून शिधापत्रिकाधारकांना विहित परिमाणात शासन निर्धारीत किंमतीत व शासनाने निश्चित केलेल्या दर्जानुसार जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याच्या दृष्टीने आवश्यक सर्व बाबींचा विचार करुन त्याबाबतच्या सूचना संबंधित अधिका-यास पाठविणे.
१०) शिधापत्रिकाधारकांचे सोयीचे दृष्टीने रास्त भाव धान्य दुकानाचे दुकानाच्या कार्यक्षेत्राच्या पुनर्रचनेबाबत विचार करुन सूचना करणे.

११) रास्त भाव दुकानास भेट देवून त्या दुकानाची तपासणी करणे.
१२) शासकीय गोदामांना भेट देऊन रास्त भाव दुकानदारांना दिल्या जाणा-या शिधावस्तूंच्या दर्जाची पाहणी करणे व त्याविषयी आपले अभिप्राय / शिफारशी संबंधितांना पाठविणे.

२) सुशिक्षित बेरोजगार

३) अपंग व्यक्ती

४) माजी सैनिक, रणांगणात धारातीर्थी पडलेल्या अथवा माजी सैनिकांची विधवा पत्नी, त्यांचा सज्ञान मुलगा अथवा सज्ञान अविवाहीत मुलगी

५) प्रकल्पग्रस्त व्यक्ती.

६) अनुसूचित जाती/जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील व्यक्ती.

७) मागासवर्गीय ग्राहक सहकारी संस्था

२१

८) स्त्रियांची ग्राहक सहकारी संस्था

९) इतर ग्राहक सहकारी संस्था

१०) ग्राम पातळीवरील विविध सेवा सहकारी संस्था

११) इतर

## हॉकर्स परवाने

हॉकर्स परवाने दि महाराष्ट्र केरोसिन डिलर्स लायसेंसिंग ऑर्डर,१९६६ या आदेशाअंतर्गत देण्यात आलेले आहेत.तथापि शासनाने सदर आदेश अधिक्रमित करून "दि महाराष्ट्र सार्वजनिक वितरण व्यवस्था (पी.डी.एस.) केरोसिन घाऊक विक्रेता,अर्धघाऊक विक्रेता व हॉकर्स (अनुज्ञापन) आदेश २००९ " निर्गमित केले आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत हॉकर्स परवाने मंजूरीवर राज्य शासनाने बंदी घातलेली असून सध्या कार्यरत असलेल्या हॉकर्स परवानाधारकांच्या निधनानंतर त्यांच्या वारसास किरकोळ केरोसिन परवाने देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

## केरोसिन वितरणाबाबत तक्रारी

केरोसिन वितरणाबाबत तक्रारी /सूचना असल्यास जिल्हा पातळीवर अप्पर जिल्हाधिकारी व मुंबई/ठाणे शिधावाटपक्षेत्रात नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांच्याकडे कराव्यात.

**पेट्रोल पंप व गॅस एजन्सी** :-

पेट्रोल पंप व एल.पी.गॅस वितरकांची नेमणूक केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार तेल कंपन्या करु शकतात. ज्या ठिकाणी पेट्रोल, डिझेल पंप व गॅस वितरकांची नियुक्ती करावयाची आहे, त्या ठिकाणच्या सर्वाधिक खपाच्या एका मराठी व एका इंग्रजी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तेल कंपन्या अर्ज मागवितात. त्यानंतर पात्र उमेदवारांच्या डिलर निवडमंडळामार्फत मुलाखती घेऊन डिलर शिफारशीनुसार पेट्रोल डिझेल पंप व गॅस वितरकांची नेमणूक करण्यात येते.

गॅस व पेट्रोल डिझेल वितरणाबाबत तक्रार अथवा सूचना करावयाच्या असल्यास तेल कंपन्यांचे कार्यालय, राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, मेकर टॉवर, "इ" विंग, १२ वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५ यांच्याकडे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे व अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडे कराव्यात.

जिल्हाधिका-यांनी रॉकेलचा परवाना देणे किंवा रद्द करणे याबाबत घेतलेल्या कोणत्याही निर्णयावर विभागीयपुरवठा आयुक्तांकडे अपील दाखल करता येते. पुरवठा आयुक्तांनी किंवा मुंबई शिधावाटप क्षेत्रात नियंत्रकांनी दिलेल्या निर्णयावर पुरवठा मंत्र्यांकडे किंवा राज्यमंत्र्यांकडे अपील करता येते.

## विभागाकडून देण्यात येणारे विविध परवाने

(क) परवाना  शुल्क

परवाना फी व व्यापा-याकडील

| अनुक्रमांक (१) | आदेशाचे नाव (२) | | परवाना फी रूपये (३) | अनामत रक्कम रूपये (४) | नूतनीकरण शुल्क रूपये (५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती साखर (साठा) आदेश,२००९ | घाऊक | १,००० | ५,००० | ५०० |
| | महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञाप्ती साखर (साठा) आदेश,२००९ | किरकोळ | २०० | ५०० | १०० |
| २ | महाराष्ट्र अन्नधान्य व्यापार परवाना आदेश,१९९८. | घाऊक | १,००० | ५,००० | ५०० |
| ३ | महाराष्ट्र सार्वजनिक वितरण व्यवस्था (पीडीएस) केरोसिन घाऊक विक्रेता, अर्धघाऊक विक्रेता व हॉकर्स (अनुज्ञापन) आदेश,२००९ | घाऊक<br>अर्धघाऊक<br>हॉकर्स | १०००<br>५००<br>२५० | १०,०००<br>६,०००<br>२,००० | ५००<br>२५०<br>१२५ |
| ४ | महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार परवाना आदेश, १९७९ | अन्नधान्य<br>केरोसिन | २००<br>५०० | ५००<br>३,००० | १००<br>२५० |

| | | |
|---|---|---|
| | खाद्यतेलबिया :-३० क्विंटल वा त्यापेक्षा जास्त खाद्यतेलबियांचा किरकोळ व्यवसाय करावयाच असल्यास | |

अधिसूचनांद्वारे साखरेच्या साठयासंदर्भात चार महिन्यांच्या कालावधीसाठी निर्बंध
तेलबिया व तेल,हायड्रोजनेटेड तेल, वनस्पती तेल व डाळी इत्यार्दीवरील परवाना काढण्याचे निर्बंध उठविण्यात शासनाच्या दिनांक २ एप्रिल २००९ च्या अधिसुचनेअन्वये दिनांक १६ जून २००३ च्या अधिसूचनेअन्वये निर्बंध घालण्यात आले आहेत.

२५

## विवरणपत्र - २

## साठा मर्यादा

| अ. क्र | तरतूद | तांदुळ व धान | डाळी | खाद्यतेल बिया | खाद्यतेल |
|---|---|---|---|---|---|
| १ | घाऊक व्यापारी | महानगरपालिका क्षेत्र:- जास्तीत जास्त *५०००* क्विंटल जास्तीत जास्त दहा दिवसा करीता उर्वरीत ठिकाणी : जास्तीत जास्त *३०००* क्विंटल जास्तीत जास्त दहा दिवसा करीता | महानगरपालिका क्षेत्र :- जास्तीत जास्त *६०००* क्विंटल A शहरांसाठी:- जास्तीत जास्त *५०००* क्विंटल उर्वरीत ठिकाणी : जास्तीत जास्त *३०००* क्विंटल | महानगरपालिका क्षेत्र :- जास्तीत जास्त *३०००* क्विंटल उर्वरीत ठिकाणी : जास्तीत जास्त *१०००* क्विंटल | महानगरपालिका क्षेत्र :- जास्तीत जास्त *१२००* क्विंटल उर्वरीत ठिकाणी : जास्तीत जास्त *५००* क्विंटल |
| २ | किरकोळ व्यापारी | महानगरपालिका क्षेत्र:- जास्तीत जास्त *२००* क्विंटल व उर्वरीत ठिकाणी : जास्तीत जास्त *१००* क्विंटल | महानगरपालिका क्षेत्र : - जास्तीत जास्त *२००* क्विंटल उर्वरीत ठिकाणी : जास्तीत जास्त *१५०* क्विंटल | महानगरपालिका क्षेत्र :- जास्तीत जास्त *२००* क्विंटल उर्वरीत ठिकाणी : जास्तीत जास्त *१००* क्विंटल | महानगरपालिका क्षेत्र :- जास्तीत जास्त *४०* क्विंटल उर्वरीत ठिकाणी : जास्तीत जास्त *२०* क्विंटल |
| ३ | मिलर्स | एकावेळी जास्तीत जास्त *साठ* दिवसाच्या दळण क्षमतेएवढा | Unmilled Pulses: मागील तीन वर्षापैंकी कोणत्याही वर्षी जास्तीत जास्त वापर केलेल्या डाळीच्या १/६ अथवा नव्याने चालू केलेल्या मिलसाठी वार्षिक | मागील तीन वर्षापैंकी कोणत्याही वर्षी जास्तीत जास्त वापर केलेल्या तेलबियांच्या १/६ अथवा नव्याने | मागील तीन वर्षापैंकी कोणत्याही वर्षी जास्तीत जास्त उत्पादनाच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | अनुज्ञप्तीच्या अर्जावर निर्णय घेण्यास लागणारा कालावधी | परिपूर्ण स्वरूपात अनुज्ञापक प्राधिका-याकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावानंतर कामाचे ४५ दिवस | |
| ९ | अपील /पुनरिक्षण | राज्य शासन | मुंबई,ठाणे शिधावाटप क्षेत्रात नियंत्रक,शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई व जिल्हास्तरावर विभागीय आयुक्त यांच्याकडे |
| १० | स्वाधिकारे अपिल/पुनरीक्षण | राज्य शासन | |

२७

## ६. वैध मापन शास्त्र यंत्रणेमार्फत देण्यात येणा-या सेवा

वैध मापन शास्त्र यंत्रणेमार्फत खालील प्रमुख अधिनियम व नियमांची अंमलबजावणी करण्यात येते :-

१. वजने व मापे, मानके अधिनियम १९७६

२. वजने व मापे, मानके ( अंमलबजावणी ) अधिनियम १९८५

३. वजने व मापे, मानके (आवेष्टित वस्तू ) नियम १९७७

४. महाराष्ट्र वजने व मापे, मानके (अंमलबजावणी ) नियम १९८७

५. महाराष्ट्र वजने व मापे, मानके (अंमलबजावणी ) नियम २०००

उपरोक्त अधिनियम /नियमांतील तरतुदी फक्त व्यापार उदिमापुरत्याच मर्यादित राहिल्या नसून त्यामध्ये औद्योगिक उत्पादने व मानवी सुरक्षा या क्षेत्राचाही अंतर्भाव करण्यात आलेला आहे. त्यातील काही ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

१. **वजन मापांची पडताळणी व मुद्रांकन** :- वजन माप उपयोगकर्त्याकडील वजन माप इत्यादींची वर्षातून एकदा पडताळणी व मुद्रांकन करुन घेणे कायद्याने बंधनकारक आहे. या पडताळणीसाठी उपयोगकर्त्यांने आपली वजने, मापे संबंधित निरीक्षकास सादर करावयाची असतात. ही वजने व मापे परवानाधारकामार्फतही सादर करता येऊ शकतात. ग्रामीण पातळीवर यासाठी निरीक्षक शिबीराचे आयोजन करतो .

२. **वजन माप विषयक परवाने** :- उपरोक्त अधिनियम/नियमातील तरतुदींनुसार विहित परवाना असल्याखेरीज कोणासही वजन मापांचे उत्पादन, दुरुस्ती व विक्री करता येत नाही. यासाठी उत्पादकाचा परवाना नियंत्रक, वैध मापन शास्त्र कार्यालयाकडून देण्यात येतो. तर विभागीय कार्यक्षेत्रासाठी दुरुस्तीचे परवाने उपनियंत्रक कार्यालयाकडून देण्यात येतात. तर विक्रीचे परवाने जिल्हा स्तरावर सहायक नियंत्रक यांच्या कार्यालयाकडून देण्यात येतात. परवाना अर्जाचा नमुना संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असतो तसेच

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | कार्यालयीन दिवशी | |
| ३ | वजन माप उत्पादकांना उत्पादन, विक्री व दुरुस्ती अर्जानुसार परवाना देणे तसेच<br>महाराष्ट्र राज्य किंवा एकापेक्षा जास्त प्रादेशिक विभागांसाठी दुरुस्ती परवाना देणे, (संपुर्ण कागदपत्रांसह अर्ज केल्यास ) | उपनियंत्रक, मुख्यालय | ४५ दिवस | नियंत्रक |
| ४ | वजन माप दुरुस्तक यांना प्रादेशिक विभागासाठी अर्जानुसार परवाना देणे (संपुर्ण कागदपत्रांसह अर्ज केल्यास ) | प्रादेशिक उपनियंत्रक | ४५ दिवस | नियंत्रक |
